महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, अहमदनगर यांचे कार्यालय
पत्ता : इंपेरिअल चौक, स्टेशन रोड, अहमदनगर. पिन क्रमांक : ४१४ ००१, दूरध्वनी क्रमांक : (०२४१) २४७१३२२
email-ddcahnagar@gmail.com

जा.क्र. जिपसंउआ /द्रवनत्र पात्रे/निर्लेखन/ ११५८ /२०२० अहमदनगर दि. ८/११/२०२०

# जाहिर लिलाव

जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र अहमदनगर या कार्यालयातील निर्लेखन झालेल्या निरुपयोगी द्रवनत्र पात्रांचा लिलाव दि. २६.११.२०२० रोजी सकाळी ११.०० वा.

निरुपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करणा-या इच्छुक व्यक्ती /संस्था/ कंपन्या / खरेदीदार यांना सुचित करणेत येते की जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, अहमदनगर या कार्यालयातील निरुपयोगी निर्लेखित केलेल्या विविध आकाराच्या द्रवनत्र पात्रांची जाहिर लिलावाव्दारे विक्री करावयाची आहे. सदर द्रवनत्र पात्रे इच्छुकांना आहेत त्या स्थितीत पाहण्यासाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. लिलाव करावयाच्या द्रवनत्र पात्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | लिलावाचा दिनांक व वेळ | द्रवनत्र पात्रांचा तपशिल | संख्या |
|---|---|---|---|
| १ | २६ नोव्हेंबर २०२० सकाळी ११.०० वा. | टी.ए. -५५ द्रवनत्र पात्रे | ६३ |
| २ | | आय. आर.-३ द्रवनत्र पात्रे | ९३ |
| ३ | | आय.एन.-५० द्रवनत्र पात्रे | २८ |
| ४ | | बी.एल.-०३ द्रवनत्र पात्रे | ३४ |
| ५ | | बी.ए.-२० द्रवनत्र पात्रे | ३५ |
| ६ | | बी.एन.-०३ द्रवनत्र पात्रे | ७८ |
| ७ | | टी.ए.-६० द्रवनत्र पात्रे | ११ |
| ८ | | १.५ लीटर क्षमतेची द्रवनत्र पात्रे | ११ |
| ९ | | बी.ए.-०३ द्रवनत्र पात्रे | २२ |
| १० | | बी.ए.-३५ द्रवनत्र पात्रे | ४ |
| ११ | | इ.टी.-०५ द्रवनत्र पात्रे | ९ |
| | | एकुण | ३८८ |

उपरोक्त नमुद निरुपयोगी द्रवनत्र पात्रांचा दि. २६ नोव्हेंबर २०२० रोजी सकाळी ११.०० वा.जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, इंपेरिअल चौक, स्टेशन रोड, अहमदनगर येथे जाहिर लिलाव करण्यात येणार आहे. ज्या व्यक्ती /संस्था/ कंपन्या / खरेदीदार यांना निरुपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करावयाची असतील अशा व्यक्ती /संस्था/ कंपन्या / खरेदीदार यांनी लिलाव प्रक्रियेत भाग घेणेसाठी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या नावे ( **Demand Draft of Rs. 10000/- in favour of District Deputy Commissioner, Animal Husbandry Payable at Ahmednagar** ) रु. १००००/- (अक्षरी दहा हजार मात्र) चा धनाकर्ष लिलाव प्रक्रियेपुर्वी या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. जाहिर लिलावासाठी गठित जिल्हास्तरीय समितीचा निर्णय अंतिम राहील. लिलावानंतर विक्री करावयाची सर्व द्रवनत्र पात्रे ही चेपल्यानंतरच हस्तांतरीत करण्यात येतील जेणेकरुन त्यांचा पुनर्वापर करणे शक्य होणार नाही.

सोबत – लिलावाच्या अटी व शर्ती

( डॉ. बी.एन. शेळके )
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त
अहमदनगर

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, अहमदनगर यांचे कार्यालय
पत्ता : इंपेरिअल चौक, स्टेशन रोड, अहमदनगर. पिन क्रमांक : ४१४ ००१, दूरध्वनी क्रमांक : (०२४१) २४७१३२२
email-ddcahnagar@gmail.com

जा.क्र. जिपसंउआ /द्रवनत्र पात्रे/निर्लेखन/ ११५८ /२०२० अहमदनगर दि. ४/११/२०२०

जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र अहमदनगर या कार्यालयातील निर्लेखन झालेल्या निरुपयोगी द्रवनत्र पात्रांचा लिलाव दि. २६.११.२०२० रोजी सकाळी ११.०० वा.

## अटी व शर्ती

१. भाग घेणा-यास अनामत रककम रुपये १००००/- अक्षरी दहा हजार मात्र धनाकर्षाच्या (डी. डी.) स्वरुपात लिलावापुर्वी या कार्यालयात भरावी लागेल.

२. लिलावात सहभागी होणा-या बोली धारकाने धनाकर्ष , स्वत: चे आधार कार्ड व इतर अनुषंगीक कागदपत्रे सादर करण्याची वेळ सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत असेल. त्यानंतर सहभागी होणा-या बोलीधारकांचे धनाकर्ष व इतर कागदपत्रे स्विकारले जाणार नाहीत.

३. सदरचे धनाकर्ष अयशस्वी बोलीधारकास लिलाव पुर्ण होताच परत करणेत येतील.

४. यशस्वी बोलीधारकाचा अनामत रकमेचा धनाकर्ष लिलावाची रक्कम पुर्ण भरल्यानंतर परत करणेत येईल किंवा रु. १००००/- वजा जाता उर्वरित मंजुर बोलीची रक्कम त्यास भरावी लागेल.

५. लिलाव तीन वेळा पुकारल्यानंतर अंतिम निर्णय घेणेत येईल. सर्व वस्तुंची मिळुन बोली बोलावी लागेल. विशिष्ट वस्तुसाठी बोली बोलता येणार नाही.

६. लिलावामध्ये ज्या बोली धारकाची बोली सर्वाधिक असेल त्याच्याच नावाने लिलाव तीन वेळा बोली पुकारुन लिलावास अंतिम मंजुरी देणेत येईल.

७. अंतिम लिलाव ज्याच्या नावाने मंजुर होईल त्या व्यक्तिने लिलावाची संपुर्ण रक्कम या कार्यालयाच्या खालील बँक खात्यात आरटीजीएस अथवा धनाकर्षाव्दारे जमा करणे बंधनकारक राहील. पुर्ण रक्कम त्वरीत न भरल्यास त्या व्यक्तिची अनामत रक्कम जप्त करणेत येईल व सदरचा माल नंतरची जास्त बोली असलेल्या व्यक्तिस देण्यात येईल. रक्कम भरावयाच्या बँक खात्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| Bank A/C Name | District Deputy Commissioner of Animal Husbandry Ahmednagar |
| Bank A/C No. | 60355614216 |
| IFS Code | MAHB0000024 |
| Bank Name | Bank Of Maharashtra , City Branch, Ahmednagar |

८. अंतिम लिलाव ज्याच्या नावाने मंजुर होईल त्या व्यक्तिने लिलावातील संपुर्ण वस्तुंची वाहतुक स्वत:च्या वाहनाने त्याच दिवशी करावयाची आहे. या कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारचे वाहन, हमाल, मदतनीस मिळणार नाही. तसेच द्रवनत्र भांडे चेपुन घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुध्दा संबधित बोलीधारकाने करणे बंधनकारक राहील. तसेच लिलाव अंतिम झाल्यापासुन मालाची प्रत्यक्ष वाहतुक करेपर्यंत लिलावाच्या वस्तुचे संरक्षण बोली धारकाने स्वत: करावयाचे आहे. या कालावधीत लिलावातील कोणतीही वस्तु गहाळ झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

९. लिलावामध्ये समाविष्ट असलेल्या वस्तु ज्या स्थितीत आहेत त्या स्थितीत घ्याव्या लागतील. लिलावाच्या वस्तु अगोदरच पाहुन घ्याव्यात नंतर कुठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

१०. लिलावात सहभागी होणा-याने स्वत:ची ओळख, त्यांचा पत्ता याच्या पुष्ठयर्थ कागदपत्रे सादर करावी लागतील . उदा. पॅन कार्ड , निवडणुक ओळखपत्र , आधार कार्ड इ.

११. लिलावास अंतिम मंजूरी देणे अथवा लिलाव नाकारणे , स्थगित करणे किंवा संपुर्ण लिलाव प्रक्रिया रदद करण्याचा पुर्ण अधिकार लिलाव समितीस असेल व तो बोलीधारकास बंधनकारक असेल.

१२. लिलावाच्या दरम्यान लिलावासंबंधी कोणताही वाद उद्‌भवल्यास या बाबतचा अंतिम निर्णय हा अध्यक्ष लिलाव समिती यांचा असेल व सर्व बोली धारकांना तो बंधनकारक राहील.

१३. वरील सर्व अटी व शर्ती मंजुर असल्याचे हमीपत्र बोलीधारकाने दिल्यानंतरच त्याला लिलाव प्रक्रियेत भाग घेता येईल याची नोंद घ्यावी.

१४. लिलावाचे ठिकाण- जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, पशुवैदयकिय सर्वचिकित्सालय अहमदनगर परिसर, इंपेरिअल चौक , स्टेशन रोड , अहमदनगर

( डॉ. बी.एन. शेळके )
अध्यक्ष लिलाव समिती तथा
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त , अहमदनगर